-६५-

# परदेशामध्ये घेतलेल्या वैद्यकीय उपचारांवर आणि भारतामध्ये विशेषज्ञांकडून घेतलेल्या उपचारांवर केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती तसेच अग्रीम देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे -- एकत्रित आदेश

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
निर्णय क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य-३
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक :-२१ ऑगस्ट, १९९९

...णय :-

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी शासकिय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्याकरिता निर्गमित केलेले शासन निर्णय क्र.(१) एमएजी/१०८४/ ४१५७/ सीआर १५६/ आ.९, दिनांक २९.४.८५ (२) एमएजी/ १०८३/ ४११९/ पीएच ९/ दिनांक २१.८.८५ (३) एमएजी / १०८८/३८३७/आ.९, दिनांक २३.१.८९ व (४) एमएजी १०९५/ सीआर ४५/ आरोग्य-७, दिनांक १५.११.९७अधिक्रमीत करुन पुढील प्रमाणे एकत्रित आदेश निर्गमित करण्यांत येत आहेत:-

परदेशातील वैद्यकिय उपचार :-

१. (एक) नियमानुसार परदेशात घेतलेल्या वैद्यकीय उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती देण्यात येऊ नये.

(दोन) वरील (एक) येथील तरतूदीस केवळ अपवादात्मक प्रकरणी भारतामध्ये जे अद्याप व्यापक प्रमाणात उपलब्ध नसतील अशा प्रकारचे उपचार आवश्यक असणाऱ्या आणि ज्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची, वैद्यकिय सल्ल्यावरुन त्यांच्या स्वतःच्या खर्चाने उपचारासाठी परदेशात जाण्याची इच्छा असेल त्यावेळी यापुढे दिलेल्या निर्देशानुसार स्थापन करावयाच्या वैद्यकीय मंडळाने अशी प्रकरणे योग्य ठरविली तर संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रतिपूर्ती देण्यासंबंधीचे प्राधिकार द्यावेत परंतु अशा प्रकरणी करण्यात येणारी वैद्यकिय खर्च प्रतिपूर्ती ज्या आजारावर भारतामधील मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटल येथे उपचार घेतले असते तर जितका खर्च आला असता तितक्या खर्चाइतकी मर्यादित ठेवण्यात यावी अशा प्रकरणांमध्ये रुग्ण आणि / किंवा त्याची सोबत करणाऱ्या व्यक्तीच्या विमान भाडयाच्या प्रतिपूर्तीचा प्रश्न विचारात घेण्यात येऊ नये.

(तीन) खाली नमूद केलेल्या आजारावरील उपचार अद्याप भारतात सर्वसाधारणपणे उपलब्ध नाहीत, असे संचालक, आरोग्य सेवा यांनी प्रमाणित केलेल्या प्रकरणी जे कर्मचारी स्वतःच्या प्रवास खर्चाने परदेशात उपचार करण्यास तयार असतील, अशा प्रकरणी, परदेशात घेतलेल्या वैद्यकिय उपचारावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीचा विचार करण्यांत येईल.

(१) मृतदेह, मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (कॅडॅव्हर किडनी ट्रान्सप्लान्ट)

(२) ज्यांच्यावर पूर्वीच परदेशात हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी)झालेली आहे अशा रुग्णाच्या आवर्तीत पुन्हा रक्तसंवहनी शस्त्रक्रिया करणे (रिव्हॅस्कुलरायझेशन)

(३) अस्थिमज्जा प्रतिरोपण (बोन मॅरो ट्रान्सप्लॅन्ट)

(४) अतिनिकट दृष्टिता (मायोपिया) विकार असणाऱ्या रुग्णाचा शस्त्रक्रियेद्वारा दृष्टी सुधार.

३९७०५

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
7 OCT 1999

(५) जटिल नील हृदयक्षति (सायनोट-हार्ट-लेशन) आणि हृदयविकार पिडीत नवजात अर्भके.

२.(एक) परदेशी उपचार घेण्यासाठी आवश्यकता प्रमाणित करण्याकरिता संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय मंडळ स्थापन करण्यात आलेले असून त्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

| | |
|---|---|
| (१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण, माता बालक यांचे आरोग्य आणि शाळांतील मुलांचे आरोग्य), पुणे | सदस्य. |
| (२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य. मुंबई | सदस्य |
| (३) वरिष्ठतम प्राध्यापक, औषध वैद्यक शास्त्र ग्रॅन्ट वैद्यक महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| (४) वरिष्ठतम प्राध्यापक, शल्यचिकित्सकशास्त्र, ग्रॅन्ट वैद्यक महाविद्यालय, मुंबई | सदस्य |

प्रतिपूर्तीसाठी करावयाच्या मागण्या पूर्व सहमतीसाठी विभाग प्रमुखामार्फत / प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येतील आणि हे प्रमुख अशा सर्व मागण्या वैद्यकीय मंडळाकडे पाठवतील मंडळ, प्रतिपूर्तीची समर्थनीयता व मर्यादा यासंबंधात निश्चित स्वरुपाची शिफारशी करील. संदर्भाधीन उपचार भारतामध्ये उपलब्ध नसल्याचे आणि आजार वरील परिच्छेद १(तीन) खालील आजारांत अंतर्भूत असल्याचे देखील मंडळाने प्रमाणित केले पाहिजे, संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई वैद्यकिय मंडळाने दिलेले असे प्रमाणपत्र, पृष्ठांकित करुन ते प्रकरण ज्याने मंडळाकडे पाठविले असेल, त्या संबंधित प्रशासनिक विभागाकडे / विभाग प्रमुखाकडे पाठवतील.

(दोन) भारत सरकारच्या ज्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे राज्य मंडळाकडे पाठविण्यात येतील त्यांच्या बाबतीत संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, वैद्यकिय मंडळ,मुंबई यांनी प्रमाणपत्र पृष्ठांकित करुन ते पुढील कार्यवाहीसाठी महासंचालक,आरोग्य सेवा,दिल्ली यांच्याकडे पाठवतील.

३. वरील प्रकरणी खर्च प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेसाठी मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये खाजगी वॉर्डातील उपचारांसाठी खर्चाची जी अनुसूची वेळोवेळी अंमलात असेल ती स्विकारण्यात येईल.

**<u>मान्यताप्राप्त रुग्णालयातील वैद्यकिय उपचार :-</u>**

४. परिच्छेद तीन ( १ ते ५) मध्ये नमूद केलेल्या ज्या विशिष्ठ उपचारांच्या संबंधात परदेशातील उपचार मिळण्यासाठी सर्वसाधारणपणे विनंतीवजा अर्ज करण्यात येतील आणि ज्यासाठी राज्य शासनाच्या रुग्णालयातील उपचारांच्या सोयी अद्याप देखील अपुऱ्या आहेत त्या विशिष्ठोपचारांच्या बाबतीत शासन याद्वारे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दिलेल्या यादीतील रुग्णालयांमधील विशिष्ठोपचार सेवेचा लाभ करुन घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. अशा प्रकरणांमध्ये विशिष्टोपचार सेवेचा लाभ करुन घेण्यास महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम शिथिल करुन विशिष्टोपचार सेवेचा लाभ करुन घेतल्यास ज्या संबंधित रुग्णालयामध्ये उपचार घेण्यात आले असतील त्या रुग्णालयाने आकारलेल्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती देण्यात यावी, मात्र त्यास प्रवास खर्चाचा अपवाद असेल. या रुग्णालयातील अधीक्षक, प्राधिकृत वैद्यकिय अधिकारी किंवा जो अधिकारी रुग्णालय प्रमुखाने घोषित केला असेल तो, शासकीय कर्मचारी /अधिकारी यांचेकरता " प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी " असेल.

**अग्रिम सुविधा :-**

५. शासनाने खाली नमूद केलेल्या ५ गंभीर आजारावरील विशिष्ठ उपचार करुन घेण्याकरीता काही शासनमान्य खाजगी तसेच शासकिय रुग्णालयांत घेतलेल्या / मागणी केलेल्या औषधे व उपकरणे यावरील संभाव्य खर्चासाठी रु. ७५,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रीम मंजूर करण्यात येईल.

**१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे**
**२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया**
**३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया**
**४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया**
**५) रक्ताचा कर्करोग**

हे अग्रिम, मंजूर करण्यासंबंधिच्या अटी व शर्ती सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केल्या आहेत.

६. वरील प्रकरणी केलेल्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीसंबंधीची सर्व देयके सोबत जोडलेल्या "क" व "ड" नमुन्यांत भरुन प्राधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या संमतीने सादर करणे आवश्यक आहे.

७. विशिष्ठ आजारांकरीता शासनाने मान्य केलेली रुग्णालयांची यादी परिशिष्ठ अ मध्ये देण्यात आली आहे. (परिशिष्ठ अ जोडले आहे)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(एल.जी.इप्पेवार)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

## परिशिष्ठ "अ"

**शासन निर्णय क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य ३, दिनांक २१ ऑगस्ट, १९९९ च्या परिच्छेद ७ मध्ये नमुद केलेल्या शासन मान्य खाजगी रुग्णालयांची यादी.**

**महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ अन्वये विशिष्ठ आजारांबाबत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थांना मान्यता देण्यात आली आहे.**

| अनु | आजाराचे नाव | | शासन मान्य संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| १(अ) | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया | १ | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल,पेराम्बूर,मद्रास |
| | | २ | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,बेल्लोर |
| | | ३ | के.ई.एम रुग्णालय, मुंबई |
| | | ४ | जसलोक हॉस्पिटल, मुंबई |
| | | ५ | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई |
| | | ६ | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. |
| | | ७ | श्री चित्राई तिरुनल इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |
| | | ८ | कंबाला हिल हॉस्पिटल ॲण्ड हार्ट इन्स्टिटयुट, मुंबई |
| | | ९ | एन एम वाडीया इस्टिटयुट ऑफ कार्डीयालॉजी, पुणे |
| | | १० | रुबी हॉल क्लिनीक, पुणे |
| | | ११ | डॉ.के.जी.देशपांडे मेमोरियल सेंटर, नागपूर |
| | | १२ | सेंट्रल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर. |
| (ब) | मुत्रपिंड प्रतिरोपण | १ | ख्रिचन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर |
| | | २ | ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. |
| | | ३ | पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयुट, चंदिगड |
| | | ४ | जसलोक हॉस्पिटल, मुंबई |
| | | ५ | रुबी हॉल क्लिनीक, पुणे |
| (क) | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे | १ | जी.बी.पंत हॉस्पिटल, दिल्ली |
| | | २ | श्री. चित्राई तिरुनल इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |
| | | ३ | पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयुट, चंदिगड |
| | | ४ | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉसिपटल, पेराम्बूर, मद्रास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५ | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल बेल्लोर. |
| | | ६ | कंबाला हिल हॉस्पिटल आणि हार्ट इनिस्टटयुट, मुंबई |
| | | ७ | सेंट्रल इंडिया इनिस्टटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर. |
| | | ८ | के.ई.एम रुग्णालय, परेल, मुंबई |
| | | ९ | ऑल इडिया इनिस्टटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. |
| | | १० | बॉम्बं हॉस्पिटल, मुंबई |
| | | ११ | एसएसकेएम हॉस्पिटल, कलकत्ता. |
| | | १२ | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. |
| | | १३ | वाडिया इन्स्टिटयुट ऑफ कार्डियालॉजी, पुणे |
| | | १४ | रुबी हॉल क्लिनिक, पुणे |
| | | १५ | डॉ.के.जी.देशपांडे मेमोरियल सेंटर, नागपूर |
| | | १६ | जसलोक रुग्णालय, मुंबई |
| (ड) | **अॅन्जीओप्लास्टी** | १ | सदर्न रेल्वेज हेडक्वार्टस हॉस्पिटल, पेराम्बूलर, मद्रास |
| | | २ | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल, बेल्लोर |
| | | ३ | के.ई.एम. रुग्णालय, परेल, मुंबई |
| | | ४ | जसलोक हॉस्पिटल, मुंबई |
| | | ५ | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई |
| | | ६ | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ |
| | | ७ | श्री चित्राई तिरुनल इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस अॅण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |
| | | ८ | रुबी हॉल क्लिनीक, पुणे |
| | | ९ | सेंट्रल इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर |
| (ई) | रक्ताचा कर्करोग | १ | टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई |
| | | २ | कॅन्सर इनिस्टटयुट, अडयार, मद्रास |
| | | ३ | इंडीयन कॅन्सर इनिस्टटयुटच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था(असल्यास) |

परिशिष्ट – ब

**शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएमजी- १०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य-३ दिनांक २१ ऑगस्ट १९९९ चे सहपत्र**

**अग्रीम मंजूरीच्या अटी व शर्ती**

(१) (अ) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ अनुसार जे शासकीय कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत अशा शासकीय कर्मचाऱ्यांना हे अग्रीम मंजूर करण्यात येईल.
अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना दोन स्थायी कर्मचाऱ्यांचा जामीन देणे आवश्यक आहे.

(क) जर पती पत्नी दोघेही शासकिय कर्मचारी असतील तर अग्रीम दोघांपैकी एकालाच मंजूर करण्यात येईल.

(२) हे अग्रीम फक्त महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ च्या तरतूदीनुसार व त्यासंबंधात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार ज्या उपकरणांच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल तेंव्हाच मंजूर करण्यात येईल.

(३) शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या अग्रीमाच्या अर्जासोबत उपकरणाची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यासाठी लागणारा संभाव्य खर्च व शस्त्रक्रियेची आवश्यकता दर्शविणारे शासकीय रुग्णालयामध्ये अथवा वेळोवेळी शासन मान्यता देण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

(४) हे अग्रीम उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यावरील संभाव्य खर्च याकरीता ७५,०००/- रुपयाच्या कमाल मर्यादेपर्यत मंजूर करण्यात येईल. सदर अग्रीमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यास प्रत्यक्षा शस्त्रक्रियेच्या दिनांकापूर्वी जास्तीत जास्त १५ दिवस अगोदर देण्यात यावी.

(५) नियमांचे योग्य पालन करुनच अग्रीम मंजूर करण्यात यावे. ज्या कारणासाठी हे अग्रीम मंजूर झाले आहे त्याच कारणांसाठी ते उपयोगात आणले गेले आहे हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

(६) (अ) काही अपरिहार्य कारणास्तव मंजूर झालेले अग्रीम खर्च न झाल्यास ते मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत वसूल करण्याता येईल अथवा शासकीय कर्मचाऱ्यास देय असलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्याा रकमेतून समायोजित करण्यात येईल

(ब) जर अग्रीमाची संपूर्ण रक्कम वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातूना अथवा इतर देय रकमेतून एकाच हप्त्यात वसूल करण्यात येईल.

(७) अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वसूल झाले नाही तर

त्यावर घरबांधणी अग्रीमासंबंधीच्या आदेशात असलेल्या व्याजाच्या कमीत कमी दराने व्याज आकारण्यात येईल.

नियम क्रमांक ८ वरील नियमानुसार, अग्रीम मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसामान्य शर्ती) नियम १९८१ च्या परिशिष्टामध्ये २ मध्ये नमूद केलेल्या विभागीय प्रमुखांना राहतील.